REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

जी.ए. कुलकर्णी यांच्या लेखनातून प्रकट होणारी धर्मसंस्कृती

डॉ. संजीव कुलकर्णी

सारांशः–

धर्म या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. त्यातील सर्वात सोपा अर्थ म्हणजे मानव व विश्व यांवर नियंत्रण ठेवणारी एक अतिमानवी शक्ति, ईश्वर अशी असून त्याचे स्मरण ठेवून त्याच्या आज्ञा म्हणून जीवनातील कर्मे करत राहणे असा आहे. धर्म या शब्दाचा व त्याच्या अर्थाचा इतिहास फार प्राचीन काळापासून म्हणजे ऋग्वेदापासून आढळून येतो. धर्माचा एक अर्थ 'धारण–पोषण करणारे, टिकवून ठेवणारे तत्व' असा आहे. म्हणजे पर्यायाने मानवाने त्या त्या देवतेच्या प्रेरणेने व आदेशानुसार आपल्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात आचरायची सदाचारात्मक व कर्मकांडात्मक कर्तव्ये व त्यांचे पालन असा धर्माचा अर्थ होतो.

प्रस्तावनाः–

व्यक्तीने आपापल्या वर्णानुसार व आश्रमानुसार प्राप्त झालेली वैयक्तिक व सामाजिक कर्तव्ये आणि सदाचार यांचे पालन करणे हा धर्माचा विस्तारीत अर्थ झाला. तैत्तिरीय उपनिषदांत आचार्य ब्रह्मचर्याश्रम संपवून गृहस्थाश्रमात प्रवेश करणाया आपल्या शिष्याला जो धर्मोपदेश करतात तो 'वंशवेल खुंटवू नकोस, देवांना आणि पितरांना हविर्होमदान करण्यास कसूर करू नकोस, मातापितरे, आचार्य आणि अतिथि–अभ्यागत यांचा निष्ठापूर्वक आदरसत्कार कर, वेदाध्यायनात खंड पडू देऊ नकोस, सत्यवचनी राहा आणि जी अनिंद्य कर्मे आहेत तीच करीत राहा' असा आहे. 'लोकांचे जीवन सुखी होऊन त्यांना इह–परलोकी सुख मिळावे हा धर्माचा हेतू असल्याचे महाभारतात सांगितले आहे. धर्म हा मानवाने सृष्टीला दिलेला एक सर्वंकष प्रतिसाद आहे. इंद्रियांना जाणवणारे विश्व आणि त्यातील सुखदु:खे ही अस्तित्वाची आणि जीवनाची परम मर्यादा नव्हे, तर दृष्य सृष्टीला आधारभूत आणि नेहमीच्या अनुभवाच्या पलीकडे असलेली अशी एक श्रेष्ठ सत्ता आहे आणि सर्वाभावेंकरून तिला शरण जाण्यात, तिच्यापुढे लीन होण्यात किंवा तिच्यात विलीन होऊन जाण्यात जीवनाचे खरेखुरे सार्थक्य आहे.[१]

धर्माच्या इतक्या व्यापक अर्थाचे आकलन जनसामान्यांच्या कुवतीबाहेरचे आहे. त्यामुळे त्यातल्या त्यात सोपे म्हणजे धार्मिक कर्मकांडे, पूजा अर्चा, उपास तापास, नवस, अभिषेक यालाच लोक धर्म समजू लागले असावेत. धर्माचा मूळ हेतू हे अवघ्या मानवजातीचे कल्याण आणि 'जो जे वांछिल तो ते लाहो' हा आहे याचा विसर पडून धर्म म्हणजे मी आणि माझा देव यांच्यातला एक करार इतकाच शिल्लक राहिला आहे. त्यामुळे धार्मिक असणे म्हणजे कर्मकांडांचे पालन करणे असे धर्माचे लोकांनी 'अति– सुलभीकरण' (over-simplification) करून टाकले आहे. त्यामुळे जो कर्मकांडे करत नाही, जो देवाला मानत नाही, तो धार्मिक नाही असे सोपे समीकरण समाजात रूढझाले असावे. जीएंच्या लेखनात प्रच्छन्नपणे दिसणारा नियतीवाद पहाता जीए हे धार्मिक स्वभावाचे आणि धर्म व त्या अनुषंगाने येणारी कर्मकांडे करणारे गृहस्थ असले पाहिजेत असा समज होण्याची शक्यता आहे. प्रत्यक्षात धर्म आणि नियती या वेगळ्या कल्पना आहेत. 'अमुक वेळी विश्वात काय

घडायचे आहे ते ठरुन गेलेले आहे. माणसाच्या प्रयत्नाने त्यात काहीही फरक पडावयाचा नाही. ते अटळच असते. पण यातील अनिवार्यता यांत्रिक नव्हे, ते बुद्धिपुरस्सर योजिलेले आहे' अशी नियती या संकल्पनेची व्याख्या आहे. 'अल मख्तूब, मख्तूब!' जे लिहिले आहे ते लिहिले आहे हे वाक्य जीएंच्या लेखनात येते. विंगाझीच्या उंट बाजारात, खजूर आणि हस्तिदंत घेऊन जाणारे कारवान जेथे अनेक शतके एकत्र होत आले, त्या अल हकाच्या विस्तीर्ण पटांगणावर हबशी गुलामांची पेठ असलेल्या कोरफ्यूराच्या तटबंदीच्या सावलीत, घडीघडीला कोणीतरी चेहरा लांब करी, हात उडवी किंवा डोळा फिरवी, आणि मग अनिवार्यपणे अल मख्तूब, मख्तूब! कारवान निघाला असता नेमक्या त्याच वेळी एखादी सांड व्याली, नगद नाणी मोजून घेतलेला, डोंगराच्या कड्यासारखा वाटणारा धिप्पाड गुलाम अकस्मात एखाद्या मच्छरासारखा मेला, पाच फूट लांबीचा दुर्मिळ हस्तिदंत उंट उधळल्यामुळे खाली पडून फुटला किंवा भर वाळवंटात दुरून येर्णाया बंदुकावाल्या बेदुईन सैतानांचा दरोडा पडला, तर हे सारे का घडले हे न समजल्यामुळे गोंधळलेला मनुष्य एकाच वाक्य उच्चारून सारे सहन करत असेरू अल मख्तूब, मख्तूब![२] म्हणजे धर्म ही ईश्वरावर श्रद्धा ठेवून व्यक्तीला लौकिक कर्तव्ये पार पाडत असतानाच पारलौकिक अनुभूतीची आस धरण्याची सकारात्मक शिकवण आहे, तर नियतीवाद या सगळ्यावरच काट मारून 'काहीच आपल्या हातात नाही, मग प्रयत्न तरी कशाला आणि प्रयत्नांच्या फळाची अपेक्षा तरी कशाला' अशा हताश विचारसरणीवर आधारलेला आहे.

जी.ए. कुलकर्णी स्वत: कट्टर नास्तिक होते आणि त्यांच्या नास्तिकतेचे पडसाद त्यांच्या लेखनात दिसतातच. 'माणूस नावाचा बेटा' सारख्या (ज्यामधील दत्तू जोशी हे काही प्रमाणात जीएच आहेत असे समजायला जागा आहे) कथेत देवाला आपणच बुजगावण्यासारखे उभे केले असे जीए म्हणतात. तो आहे म्हणून आम्ही जगत नाही, आम्ही आहोत म्हणून तो जगतो असे दत्तूला वाटते. तथापि स्वत: कट्टर नास्तिक असूनही जीएंचा धर्माचा आणि कर्मकांडांचा जबरदस्त अभ्यास होता. त्यांच्या कथांमधील पात्रे, त्यांच्या श्रद्धा, अंधश्रद्धा, त्यांनी केलेले नवस, ते फेडण्यासाठी त्यांची धडपड या सगळ्याचे विलक्षण चित्र जीएंच्या कथांमध्ये पाहायला मिळते.

'निळासावळा'[३] या जीएंच्या पाहिल्याचा कथासंग्रहातल्या 'चंद्रावळ' या कथेत पदमजी सण्ण्याला 'पारवाळापेक्षा कोंबड्या ठेव, कापता येईल अमावास्येला एखादी' असे म्हणतो. अमावास्येला नारळ फोडणे, कोंबडी कापणे या कर्मकांडांचा (आणि त्यालाच धर्म समजर्णाया लोकांचा) जीएंचा मोठा अभ्यास होता. त्यापुढच्या 'राणी' नावाच्या कथेत भाऊंची लाडकी नात राणी भाऊ आजारी असतानाच मरण पावते आणि आंधळ्या भाऊंना ते र्बयाच दिवसांनी कळते. 'वहिनीसाहेब' म्हणत दर सोमवारी अभिषेकासाठी येणारा भटजी येतो आणि त्याला रमाकाकू 'भटजी, आज अभिषेक नाही' असे सांगतात. 'म्हणजे काय?' या भटजीच्या प्रश्नावर थोडी कुजबूज होते आणि मग 'परमेश्वराची इच्छा. पोरगी मोठी गोड. परमेश्वराचे बेत काय कळणार आपल्याला? म्हार्तायाला उदंड आयुष्य आहे आणि सोनकेळीसारखी मुलगी वाया गेली' असे म्हणून भटजी निघून जातो. मयत झालेल्या घरात काही दिवस तरी धार्मिक कृत्ये होत नसतात. 'पडदा' नावाच्या कथेत प्रिन्सिपॉल ठकारांच्या लायब्ररीच्या पुस्तकांना एक लय आहे. आर्त, विव्हळ मन पौर्वात्य जीवनाच्या कल्पनेशेजारी, जगड्व्याळ दु:खाकडे स्थिर नजरेने पाहणारी बुद्धाची शांत, प्रसन्न दृष्टी आणि जिवंत शरीरातील तोडून काढलेल्या रसरशीत मांसखंडाचा ओला लालभडक रंग, स्मशानातील थडग्यांच्या क्रूसांच्या छायेत क्षणाचा स्वर्ग उपभोगणारी कुतरड्यांची जोडीही सगळी त्याच अनुभवात आली पाहिजेत, कारण एकाशिवाय दुर्सयाला काही अर्थच नाही हे ठकारांचे तत्त्वज्ञान आहे. पुढच्या 'अवशेष' मधला लंगडा गोविंदाचार्य दर मंगळवारी आणि शुक्रवारी भसाड्या, नासलेल्या आवाजात रात्री बारा वाजेपर्यंत कीर्तन करतो. हा गोविंदाचार्य घराघरांत पूजा करतो, श्राद्धे घालतो पण त्याच्या आयुष्याचे आता फक्त अवशेष शिल्लक राहिले आहेत. 'सांगाडा' कथेतील आदर्शवादी नाडगौडा मास्तरांच्या आयुष्याची शोकांतिकाच झाली आहे, पण तरी ते आंघोळ करून तुकारामाच्या फोटोपुढे बसतात, अभंग म्हणतात, 'खावे ल्यावे द्यावे, जमाखर्च तुझ्या नावे, आता चुकली खटपट, झाडापाड्याचा बोभाट, तुका म्हणे चिंताभार, वाहे तुझ्या माथा' (संतसाहित्याबद्दल अगदी अनास्था असलेले जीए त्यांच्या कथांमधील पात्रांच्या तोंडून का होईना, अभंग बोलतात हे एक विशेषच आहे). 'मुखवटा' ही कथाच देवळाच्या पार्श्वभूमीवर घडते. या कथेच्या सुरवातीला जीए लिहितात, 'गल्लीच्या कोर्पयावर औदुंबराच्या पारावर एक छोटेसे दत्ताचे देऊळ आहे. त्यात मूर्ती नाही, फक्त स्वयंभू समजलेल्या ओबडधोबड पादुका, आणि त्यावर एक पितळी मुखवटा ठेवलेला असतो. कधीतरी एखाद्या आडगुरुवारी त्यावर दोनचार फुले दिसतात. चार घरची पूजा करून कंटाळलेला रघुनाथभट (कसर लागलेली निळी शाल पांघरतो ना, तोच) कशाबशा चार अक्षता त्यावर उधळतो. आणि अगदी रात्री तो मुखवटा धाबळीच्या पिशवीत घालून घरी

घेऊन जातो. नंतर त्या पादुका उघड्या पडतात शेजारच्या लाकूडअड्ड्यातून उंदीर बाहेर येतात, व वर चढून खुशाल तांदळाचे दाणे वेचतात. कधीकधी तेलाची पणती उपडी करून त्यातील वात पळवतात, व आतील तेल मग बिचकत इकडेतिकडे पसरते. पण हे सारे शांत झाल्यावर सारी गल्ली निपचिप पडल्यावर. पण तोवर पणतीचा प्रकाश मुखवटा कुरवाळतो. निरनिराळ्या रेषांत चमचमतो, आणि शांत, निरामय, निर्विकार उघड्या डोळ्यांनी मुखवटा सारे काही पाहात असतो.' 'मुखवटा' या कथेत मग बरेच काही होते. दारिद्र्य, दु:ख, पोरकेपण यातून त्या गल्लीतली मुले–मुली भरडल्या जातात आणि एका दिवसात पोरका झालेला पण आता आपल्याशिवाय आपलया लहान भावंडांना कोणी नाही या जाणिवेने पोक्त झालेला सद्या आयुष्याच्या सहीशिक्क्यानिशी मोठा होतो. या कथेचा शेवट जीए मुद्दाम या कथेच्या आरंभासारखाच करतात. एका दिवसात इतके सगळे घडून जाते. कोंबडीच्या पिलापासून मुलांच्या आईपर्यंत कोण कोण मरून जातात पण मुखवटा निर्विकार, बिनपापणीच्या डोळ्यांनी सगळे पाहात असतो. जीएंच्या नास्तिकपणाचे या वर्णनातून अस्पष्ट दर्शन होते. या कथेतील निरागस मुला–मुलींना दु:खाची सोडाच, जगाचीही फारशी जाणीव नाही. त्यांचे बालपण संपलेले नाही. फाटके कपडे, टळटळीत ऊन, पोटातली आग आणि जाणवणारे– न जाणवणारे पोरकेपण यातून त्यांना काही कळतच नाही आणि मुखवटा नुसते सगळे पाहात असतो. धर्म, श्रद्धा, सद्वर्तन हे सगळे कधी? तर पोटात गोळाभर अन्न आहे, मळके का होईना अंगभर कपडे आहेत, झोपायला छत आहे आणि डोक्यावर कुणाचा तरी हात आहे. यातले काही नाही आणि ओबडधोबड पादुका आणि त्यांच्यावरचा निर्विकार मुखवटा या उपमांमधून जीए आस्तिकतेची त्यांना जाणवलेली निरर्थकता अधोरेखित करतात.

'रक्तचंदन'[४] या कथासंग्रहातील गणेशवाडी भट तर धर्म आणि श्रद्धा या कल्पनांची पिसेच काढतो. दत्तजयंतीला गावातली मंडळी पूजेसाठी वाट बघत बसलेली असताना शेजारच्या गावी कुस्तीच्या फडात कुस्ती खेळून तो त्यांना संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ताटकळायला लावत . त्यावर भुकेने कळवळून भटजी, दत्तजन्म करण्याची ही वेळ आहे, की काय आहे? या परशाच्या प्रश्नावर गणेशवाडी भटाने दिलेले उत्तर मुळातून वाचण्यासारखे आहे. तो खवळून म्हणतो,

अरे जा रे जा फुसकीच्या! मला आलाय विचारायला! दत्तारामाचा जन्म अमुक वेळी झाला अशी त्याच्या आयांनी काय येऊन तुमच्या कानात कुजबुज केली होती काय रे भडव्यांनो? दत्त जन्मतही नाही, संपतही नाही. संपतो तो दिवस. तुम्हाला लेको खादीला उशीर झाला, म्हणून तुमची ही ओरड! जा आता घरी आणि पिंडाएवढे गोळे गिळून पडा मढ्यासारखे! म्हणे ही वेळ की काय! हाच गणेशवाडी भट पुढे कथानायकाला डॉक्टरनी खायला सांगितलेली पण त्याच्या घरी निषिद्ध असलेली अंडी आणून देतो. तीपण कशी? तर पूजेहून येताना एका ताम्हनात फोडलेला नारळ, दोनचार फुले, पळी पंचपात्र याच्या जोडीला तीन शुभ्र अंडी! त्यावर आबांनी कुरकुर करताच तो पुन्हा गरजतो,

आब्या, याद राख हं! मला अक्कल शिकवशील तर हाडं सैल करून देईन बघ एक दिवस! हाडं आहेत की नाहीत कुणास ठाऊक म्हणा! पण असा यमासारखा एक दणका देईन की कापडानं जमिनीवरचा तुझा डाग तेवढा पुसावा लागेल बघ! लोकांची भीती तुला! परसात तांब्या घेऊन जाताना चोरी करायला निघाल्यासारखा लपूनछपून जातोस तू बेट्या! आणि मला शिकवायला आलाय! फुलं, नारळ देवानं उत्पन्न केली आणि अंडी मात्र कुणी उपटसुंभानं तयार केली होय?

घरात अंडी आणली जाणार म्हटल्यावर कथानायकाची आई म्हणते 'अंडी! पोराला अंडी घालायच्या आधी मी काशीला निघून जाईन!' यावर गणेशवाडी भट मोठ्या उत्साहाने म्हणतो, 'वा! चला तर! परवाचा शिंचा चांगला मुहूर्त आहे. मी तुमची चांगली व्यवस्था करून देईन.' त्यावर आईची पंचाईत होते. 'काशीला निघून जाते' असे म्हणणे हे तिचे एक अस्त्र असते, पण गणेशवाडी भट तेही निष्प्रभ करून टाकतो. मग आई निर्वाणीच्या स्वरात म्हणते, 'मी काही झाले तरी या घरात अंडी शिजू–तळू देणार नाही. माणसाला काही धर्म आहे की नाही?'

यावर गणेशवाडी भटाने दिलेले उत्तर धर्माचा लोकांनी लावलेला अर्थ आणि धर्माचे लोकांनी करून टाकलेले विकृत स्वरूप यावर बोट ठेवणारे आणि धर्म धर्म म्हणून टिमकी वाजवर्णायांच्या डोळ्यांत अंजन घालणारे आहे (अर्थात अशा लोकांचे डोळे उघडलेलेच नसतात हा भाग निराळा). तो म्हणतो , 'वा वा! धर्म नाही असं कसं होईल? बस्तवाडच्या रमेनं धर्मासाठी काय केलं माहीत आहे ना?' रमेचे लग्न झालेले असते आणि एका वर्षात तिचा नवरा मेलेला असतो. तिच्या घरच्या लोकांनी तिचे हातपाय बांधून तिचे केशवपन केलेले असते. रमेने दुर्सया

दिवशी विहिरीत उडी घेतलेली असते. त्या काळात लोकांनी धर्माचा हाच अर्थ काढला असेल तर त्यापेक्षा धर्म नसलेलाच बरा अशी जीएंची मानसिकता तयार झालेली दिसते.

हीच राधी वाईट नजरेची आहे म्हणून सगळ्या गावात बदनाम होते, पण आबा आणि गणेशवाडी भट तिच्या बाजूने उभे राहातात. आणि हीच राधी मरते तेंव्हा बालनायकाला वाटते की राधी म्हणजे आपल्यासाठी सुताराची लक्ष्मी, देवीच होती. जीए लिहितात,' 'ती लक्ष्मीची मूर्ती लाकडाची असून ओबडधोबड होती. ती उंच, उग्र होती व ती लालभडक रंगाने रंगवलेली होती. तिचेही चिकटवलेले केस खरबरीत वाटत आणी तिच्याही कपाळावर आडवा पट्टा असे.तिला सहा हात होते. त्यात तलवार, धान्याचे कणीस, फूल या वस्तू होत्या. एका हाताच्या तळव्यावर चांदीचे नाणे खिळा ठोकून बसविलेले होते. एका हातात पितळी तामले होते, व सुतार दर शुक्रवारी त्यात दोन थेंब दूध टाकी. उरलेला हात रिकामा होता, पण तो आशीर्वादासाठी वर उचललेला होता' या कथेतील लहान मुलाला वाटते की राधीने असेच मला सहा हातांनी दिले. तिच्या ज्या ज्या आठवणी मला येत, त्या त्या र्साया तिने मला दिलेल्या, केलेल्या गोष्टींच्याच होत्या.

देव ही मानवनिर्मित कल्पना आहे, माणसांतच देव बघावा असल्या कुठल्याही पुस्तकी कल्पना न मांडता जीए धर्माचा, श्रद्धेचा आणि माणसामाणसामधील नात्यांच्या आणि धर्माच्या र्खया अर्थाचा 'राधी' मध्ये शोध घेतात. त्या न्यायाने 'राधी' ही फार महत्त्वाची कथा आहे. 'पारवा'[५] या कथासंग्रहातील 'बळी' ही कथा धर्म या दृष्टिकोनातून क्रांतिकारी म्हणता येईल अशी आहे. परिस्थितीचे तडाखे असह्य झाले की माणूस आपला विवेक, आपला तरतमभाव हे सगळे गमावून बसतो. त्यातून जमाव एकत्र आला की सगळ्या लोकांचे मिळून एक जंगली श्वापद होते. त्या श्वापदाला बुद्धी असत नाही. कुठलेतरी लाल फडके दिसले की त्या दिशेने शिंगे उभारून, खूर दणकावत धावत सुटायचे आणि कुठेतरी शिंगे खुपसून, कुठल्यातरी शरीराला रक्तबंबाळ करून मग शांत व्हायचे एवढेच त्या श्वापदाला कळते. कुंभारवाड्याकडून येर्णाया हलगीच्या आवाजावर एक लहानशी पालखी निघाली आहे. त्याच्या पुढे काही लोक अंगाला हिसके देत नाचत आहेत, घोळक्याच्या मध्यभागी असलेल्या मोकळ्या केसाच्या, छाती बडवर्णाया चंद्रीच्या अंगात देवी आली आहे. तिच्यावर गुडगुडगंगाई मुठीने कुंकू उधळत आहे. गेल्या खंडयालाच (खंडेनवमी) तिला दिलेल्या बर्कयाच्या बळीने देवीचे समाधान झालेले नाही. आता तिला माणूस पाहिजे आहे, नरबळी पाहिजे आहे. नाहीतर दुष्काळात सगळे गाव खाऊन टाकीन असे ती बेभानपणे बरळते आहे. आता बळी कोणाचा देणार हे गावाने ठरवेपर्यंत चंद्री धुळीत पालथी पडून मुसमुसू लागते. देवी तात्पुरती तिच्या अंगातून गेली आहे.

आता बळी कुणाचा द्यायचा हे सखाराम पाटलाला सांगायला कुणी लवकर पुढे येत नाही. शेवटी गुडगुडगंगाई काठी टेकत पुढे येते आणि कुंकवाने माखलेला हात नाचवत म्हणते.'मी बोलतुया पाटील. व्हय, इथ्थच हाय एक मानूस. बेवारशी कुर्त्यासारखं आईबाप उलथवले या सटवीनं, आनी गावाच्या मुळावर येऊन बसलीय. तेंव्हापस्न पटकी हाय, प्लेग हाय, याच वेसवेला कशी धाड होत नाही, देव जाणे! पाटील, मी सांगतोया, ती आग गेल्यापरगाव अंग धरणार न्हाई, ती तुमची घुबडी अमाशी'

धर्माच्या, देवाच्या, श्रद्धेच्या नावाखाली माणसाचे कोणत्या पातळीवर अध:पतन होऊ शकते हे गुडगुडगंगाईच्या या बोलण्यातून लक्षात येते. अमाशी बेवारस, अर्धवट बुद्धीची, काटक्यांसारख्या पायांची लंगडी लहानशी मुलगी आहे. अर्धवट डोक्याच्या मुलांच्या चेर्हयावर एक अर्थशून्य आनंद असतो तशा आनंदात ती काहीबाही करत असते. अशा मुलीबाबत बोलताना गुडगुडगंगाई 'वेश्या' हा शब्द वापरते. सगळे गावच आता अमाशीचा बळी घ्यायला तापले आहे हे खरे, पण या म्हातारीच्या काळजात काहीही ममता, करुणा शिल्लक नाही आणि आता तिला फक्त अमाशीचे रक्त आणि देवीची भागणारी तहान दिसते आहे हे मती गुंग करून टाकणारे आहे. महारांच्या हलग्यांच्या तालावर देवी आता जणू सगळ्या गावाच्या अंगातच येते. गुडगुडगंगाई मूठभर कुंकू अमाशीच्या झिंज्यांवर उधळते आणि एक फक्का तिच्या नाकाडोळ्यांवर फिरवते. विहीरीच्या कमानीतल्या फुटक्या मूर्तीच्या कोनाड्यात ढकलेलेया अमाशीच्या चीत्कारांना न जुमानता तिच्यावर दगडांचा वर्षाव सुरू होतो आणि रक्तबंबाळ झालेली अमाशी संपून जाते. जमावाने धर्माच्या नावाखाली चालवलेले एवढे क्रौर्य पुरेसे नाही म्हणून की काय, चंद्रीच्या पुन्हा अंगात येते आणि अंगात आलेली देवी हातवारे करत गावावर थुंकते आणि म्हणते, 'मला असला नासका घास घालणार तुम्ही.. मला घास चखोट (पूर्ण, निरोगी) पाहिजे!'

सगळ्या गावाबरोबर, सखाराम पाटलाबरोबर, गुडगुडगंगाईबरोबर वाचकाला सगळ्यात मोठा धक्का इथे बसतो. 'फुकट जन्माला आलं लांडरु, फुकट मारून गेलं' असे म्हणर्णाया सखाराम पाटलाला कशाचाही अर्थ

कळत नाही तसाच तो वाचकालाही कळत नाही. धर्माच्या नावाखाली जे काही घडते त्याच्या विक्राळ दर्शनाने वाचक सुन्न होऊन जातो. मग इथे जीएंसोबतच वाचकाच्या मदतीलाही जीएंची लाडकी नियतीच येते. जे झाले तेच व्हायचे होते. अमाशीचा जीव तर जाणारच होता, पण देवीची तहानही भागणार नव्हती. अल मख्तूब, मख्तूब!

'हिरवे रावे'[६] या जी.ए.कुलकर्णी यांच्या कथासंग्रहातील 'तुती' ही एका महत्त्वाची कथा आहे. आर्थिक तंगीला वैतागून नाना संध्याकाळच्या वेळी आईच्या पाटल्या विकायला की गहाण टाकायला बाहेर पडतात. तेंव्हा आई म्हणते, ' अहो, नको या वेळी! लक्ष्मी घरी यायची ही वेळ, तुम्ही उद्या जा. ऐका माझा एवढं', पण नाना तसेच बाहेर पडतात. नाइलाजाने ते कुटुंब दुर्सया घरात राहायला जाते. त्या घरात ब्रह्म असतो. ब्रह्म म्हणजे जमिनीलगतच्या एका कोनाड्यात असलेला कुंकू, शेंदूर लावून लालभडक केलेला एक मोठा गुंड, गुळगुळीत दगड. नवीन घरात ब्रह्म आहे म्हटल्यावर सगळे घाबरतात, पण नाना म्हणतात, ' ब्रह्म असला म्हणून काय झालं? खातोय की काय तुम्हाला? महिना–पंधरवड्यानं एखादा नारळ फोडला की झालं!' त्यानंतर त्या कुटुंबात बरेच काही होते, बरेच काही हरवते. शेवटी ते घरदेखील सोडून जाताना आई ब्रह्माविषयी म्हणते, 'नारळ दिला नाही, पण बरंच घातलं त्याच्या मढयावर!' या कथेतले लोक साधे आहेत, त्यांच्या श्रद्धा आहेत, पण त्या श्रद्धादेखील शेवटी त्यांचा भ्रमनिरास करतात. फार चिकित्सा न करणारे, प्रवाहाबरोबर वाहाणारे हे साधे, सोप्या मनाचे लोक आहेत. त्यांनाही शेवटी धर्माचा, देवाचा, त्यांच्या श्रद्धांचाही आधार मिळत नाही.

'बाधा' मधल्या रमेला तर कसला तरी चळच लागला आहे. घरभर पाणी भरून ठेवताना तिला ते आपल्या सासूला सोवळ्याचे पाणी लागते हे कळते पण आज भरून ठेवलेले पाणी उद्या पूजेला चालणार नाही हे कळत नाही.तिला कुणाला तरी जंगमाला, देवरुषाला दाखवावे असे सुचवले जाते, तिच्या सासूलाही तसे वाटून जाते. त्या संध्याकाळी दिवेलागणीला कापसाच्या फूलवाती करत बसतात, तलावावर शेवटचे जाण्याआधी रमा आपल्या हातातली काकणे सईला देऊन टाकते (एकेक काकण हातात ठेऊन), 'माझं काय मी नागपंचमीला भरीन की' असे ती म्हणते. हे सगळे या लोकांचे विश्वास आहेत. हातात एक तरी बांगडी ठेवावी, सुवासिनीने हात तसेच भुंडे ठेवू नयेत, नवीन काकणे सणाला भरावीत (त्यातही नागपंचमी हा स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाचा सण).. हा सगळा संस्कारांचा, संस्कृतीचा भाग आहे. पण यामागे एक भाबडी धार्मिकताही आहे. अर्थात येथेही धर्माचा अर्थ मर्यादित स्वरूपातच घ्यावा लागेल.

'काजळमाया' हा जीएंचा एक महत्त्वाचा कथासंग्रह आहे. [७] या कथासंग्रहातील 'प्रदक्षिणा' या कथेत दादासाहेबांकडून वंचना झालेली या कथेतली सगळीच पात्रे एकेक करून घर सोडून जायला निघतात. दादासाहेबांबरोबर आयुष्यभर राहिलेले, त्यांना हवे–नको ते बघणारे आबाजी पण आपण एक व्यर्थ, भिकारडे आयुष्याचा जगलो या पराभूत भावनेने आपल्या गावाकडे जायला निघतात. त्यांचे तसे कोणी नाही पण गावाकडे एक भाऊ आहे, छोटं घर आहे, गावाला नदी आहे, आंबराईत दत्ताचं देऊळ आहे. त्याची पूजा त्यांच्याच घरात असते. त्यामुळे ते दादासाहेबांच्या पत्नीला, शांताक्कांना आपल्याबरोबर चालण्याचा आग्रह करतात. डोळ्यांत पाणी आणून ते म्हणतात 'तुम्ही चला माझ्याबरोबर दहापंधरा दिवस. तेवढाच तुम्हाला विरंगुळा वाटेल. मी राहीन तिथं. कृष्णामाईनं दिलेली हाडं तिलाच परत देऊन टाकायचीच नव्हे कधीतरी!' माणसाच्या आयुष्यातील श्रद्धेचे, भावनांचे, धर्माचे महत्त्व सांगणारी ही वाक्ये आहेत. दादासाहेबांनी सगळ्यांबरोबर शांतक्कानाही तसलेच अर्थहीन, पोकळ आयुष्य दिले आहे हे त्या सरळ मनाच्या आबाजींना ठाऊक आहे. आता यातून त्यांच्या मनाला जरा शांतता मिळायची असेल तर त्यांना अशाच एखाद्या श्रद्धेच्या ठिकाणी नेले पाहिजे हे आबाजी ओळखतात. आणि शिवाय त्यांचेही आता भरत आले आहे. 'कृष्णामाईनं दिलेली हाडं' ही आबाजींची श्रद्धा सामान्य माणसाच्या विचारांचे प्रतीक आहे. आपले इथले काही नाही, आपले आयुष्य, शरीरही कोणत्यातरी पारलौकिक शक्तीच्या आधीन आहे अशी ही भावना आहे. मृत्यूनंतर नदीत अस्थिविसर्जन करण्याची प्रथा आहे. पण या अस्थी आपल्याला या नदीकडूनच मिळाल्या, आणि ती नदी, ते पाणी हेसुद्धा प्रतिकात्मकच आहे. आपल्याला मिळालेले जीवन हे पंचमहाभूतांकडून मिळालेले आहे, ते आपले नाही, आपण फक्त 'भारवाही लमाण' आहोत ही ती उच्च भावना आहे. समाजकार्यासाठी स्वत:ला वाहून घेतलेल्या दादासाहेबांची आयुष्यभर सेवा करून शेवटी अगदी रित्या हाताने (आणि तितक्याच रित्या मनाने) घरातून बाहेर पडताना आबाजी घेतात काय? तर तुळशीची चारपाच पाने! त्यापलीकडे त्यांचे मन निरीच्छ आहे. आबाजींना धर्माचा खरा अर्थ कळाला असे म्हणता येईल.

माणसाच्या प्राक्तनात जे काही येते ती त्याच्या पूर्वकर्माची फळे असतात. पूर्वजन्मीच्या कर्माची नव्हे, तर याच जन्मी त्याच्या हातून घडलेल्या पातकांची काटेरी, निवडुंगीफळे ही जीएंच्या कथांमध्ये आढळणाया पात्रांच्या

मनात येणारी एक सामान्य भावना आहे. 'प्रदक्षिणा' मधल्या शांताक्कांच्या वाट्याला निथळून टाकलेले अर्थहीन आयुष्यआले याचे कारण आपण आपल्या पूर्वायुष्यात केलेले काहीबाही आहे का या टोचणीने त्यांचे मन पोखरले जात आहे. दादासाहेबांशी लग्न झाल्यावर जान्हवीने, शांताक्कांच्या बहिणीने, वावगे शब्द काढताच तिला मत्सर वाटतो या समजुतीने तिला केलेले वाक्ताडन, आई वर्षानुवर्षे अंथरुणाला खिळली असताना 'ही स्वत: मरून आम्हालाही का एकदाची सोडवीत नाही?' असे मुद्दाम तिला ऐकू यावे म्हणून काढलेले उद्‌गार, दादासाहेबांचा भाऊ राजाभाऊ तुरुंगातून सुटून खालच्या मानेने घरी आल्यानंतर त्याला घोटभर पाणीदेखील न देता ' आता इथं पुन्हा पाऊल टाकून आमच्या तोंडाला काळं फासू नका' असे त्याला हाकलून देताना वापरलेले शब्द, शाळेत असताना तोंडावर कोड फुटलेल्या नंदिनी पाठकला 'टवके गेलेली भिंत' म्हणत केलेली निर्दय थट्टा... हे सगळे शांताक्कांना आठवते आणि आपल्या रिकाम्या आयुष्याला आपले हे वागणेच कारणीभूत झाले असेल का या भावनेने त्या भयभीत होतात. जे आपण नकळत, सहज म्हणून केले तेच पुढे आपल्यासमोर भूत म्हणून उभे राहिले ही श्रद्धा धर्माचे समाजातील स्थान दाखवते.

'अंजन' मध्ये धर्माचे एक वेगळेच स्वरूप समोर येते. खरे–खोटे, बारे –वाईट याची काही चाड नसलेला भैरु पुजारी पलीकडच्या जगात जातो तेंव्हा त्याच्या विश्वासाचे, समजुतींचे सगळे जगच उलटेपालटे होऊन जाते. अगदी बदफैली म्हणून त्याच्या मनातून उतरलेली त्याची मुलगी तिच्या नर्वयाच्या छळामुळे अशी नादान मार्गाला लागलेली असते. इनामदार डॉक्टरांकडे तांदूळ कांडायला, मिरच्या कुटायला म्हणून जाणारी त्याची बायको पार्वती खरे तर तिथल्या रोग्यांची सफाई करायला जात असते. तिच्याही पोटात गोळा झालेला असतो आणि तिचेही दिवस भरत आलेले असतात. भैरुच्या बापाचे, मल्हारीचे आयुष्य उधळून टाकणारी देवळातली चोरी गळ्यात माळ घालून भजन करर्णाया त्याच्या भावाने, भिमूकाकाने केलेली असते, आणि तो चोरलेला तोडा राघूआण्णा सराफाने विकत घेतलेला असतो. या सगळ्यांत बळी पडलेला मल्हारी, तोही काही दिसतो तितका सरळ नाही. भैरु जन्माला यायच्या आधी त्यानेच चार लोकांना बरोबर घेऊन राघूआण्णाचे दुकान फोडलेले असते. आणि सगळ्या लहान पोरांना हे वाट,ते वाट असं करून चांडं करून ठेवर्णाया दादूभटाने वकिलाच्या पोराच्या गळ्यातली साखळी चोरण्यासाठी झायाचं टोक त्या पोराच्या गळ्यात खुपसून त्याला मारून टाकलेले असते. हे सगळे लोक कसल्या ना कसल्या श्रद्धा ठेवणारे आहेत. यात एक देऊळ आहे, देवळाच्या उत्पन्नाचा वाटा आहे, मुख्य म्हणजे देव आहे. देव–धर्म हे शब्द जोडशब्दांसारखे वापरले जातात. मग हे लोक धार्मिक आहेत का? तर लौकिकार्थाने आहेत. ते देवळात जातील, पूजाअर्चा करतील, नवस मागतील आणि फेडतील. पण हे धर्माचे आचरण आहे का? वाचकाला असे अंतर्मुख करायला लावणारी ही कथा आहे.

'स्वप्न' या कथेमधल्या रामकोळ्यांची धर्माबाबतची कल्पना तर अजूनच वेगळी आहे. त्यांच्या वस्तीच्या सुरुवातीला एका लाकडी खांबात ओबडधोबडपणे कोरलेली, कवड्यांचे डोळे असलेली जखणाईची आकृती आहे. रामकोळी तिच्यावर मळवट भरतात आणि पावसाळ्याच्या सुरूवातीला वाघाजाईच्या डोंगरावर जाऊन राहायची वेळ आली की ते जखणाईचा चेहरा स्वच्छ धुवून त्यावर तेल घालून चालू लागतात. रामकोळ्यांच्यात डुक्कर खाणे वर्ज्य आहे, पण डुकराचे मांस खायला सोकावलेला रामजा रामतीर्थला एकादशीला जायचे निमित्त काढून भूक भागवून येतो, म्हातारा जखणू तीसचाळीस वर्षांपूर्वी मेलेला त्याचा बाप स्वप्नात भेटला होता असे म्हणून त्याच्यासाठी मोगाभार दारू ओढ्याकाठी ठेवून येतो आणि त्याचा मुलगा वारड्या तीच दारू चोरून पिऊन रात्रभर 'मी तुझा बा, तू माझा बा!' म्हणत धिंगाणा घालतो. रामकोळी या जमातीचा शिक्षणाशी, ज्ञानाशी, संस्कारांशी काही संबंध नाही. जगण्याच्या केवळ आदिम प्रेरणा बाळगून हे लोक जवळजवळ जनावरांच्या पातळीवरच जगत आहेत. त्यांना धर्म ही संकल्पना कदाचित ठाऊकही नसेल, पण कर्मकांडे, अंधश्रद्धा हे सगळे तेथेही आहेच. धर्माचा संबंध आचाराशी आहेच, पण तो विचाराशीही आहे, किंबहुना आधी विचाराशी आहे हे मूलभूत तत्व नागर लोकांना समजणे कठीण जाते, मग ते रामकोळ्यांच्या मागासलेल्या मनांत कसे शिरणार?

माणसाला जीवनातील उच्च तत्त्वे पेलत नाहीत म्हणून सर्वच धर्मांनी मंदीर, मशीद, चर्च यासारखे अनेक पांगुळगाडे त्याला दिले.[८] ते पांगुळगाडेही घेऊनही माणसाला स्वतंत्रपणाने उभे राहायला जमले नाही म्हणून माणसांने प्रत्येक धर्मात धर्मगुरू तयार केले. धर्मगुरूंनी धर्माचा अर्थ समजून घेऊन तो सामान्य माणसाला समजून सांगावा ही अपेक्षा आहे. पण हे धर्मगुरू म्हणजेही माणसेच आहेत हे या सगळ्या यंत्रणेच्या लक्षात आले नाही. मग या धर्मगुरूंनी तरी माणसाच्या लालसा, हाव, वासना यांसारख्या आदिम विकारांपासून दूर राहावे अशी अपेक्षा का करावी? शिवाय या धर्मगुरूंना अमर्यादित ताकद आणि अधिकार लाभले, त्यामुळे त्यांच्या उन्मादाला काही

मर्यादाच राहिल्या नाहीत. जीएंच्या 'काजळमाया' मधील 'दूत' आणि 'विदूषक' या दोन कथांमध्ये धर्माच्या या दलालांचे हे हिडीस रूप समोर येते. 'दूत' मध्ये सम्राटांचा उत्तराधिकारी म्हणून धर्मशासकाकडे राज्याची जबाबदारी सोपवण्यात यावी अशी खुद्द धर्मशासकांचीच वासना आहे आणि त्यासाठी कोणत्याही पातळीवर जाऊन, अगदी माणसाच्या माणूसपणाला लाजवेल अशी कृत्येही करण्याची त्यांची तयारी आहे. 'विदूषक' मधील धर्मगुरू तर याहीपेक्षा क्रूर पातळीवर पोचले आहेत. अभयराज आणि विजयराज यापैकी कोणाचीच सम्राटपदी निवड न होता राज्यसत्ता आपल्याकडेच यावी यासाठी या दोघांचाही मृत्यू व्हावा अशीच त्यांनी योजना करून ठेवली आहे. त्यांच्या या योजनेसमोर विदूषक अर्थात पंडीत विष्णुशर्मा, चंचला, सारे कूट आणि सांकेतिकता, सारे तर्क आणि विद्वत्ता हे कवडीमोल ठरतात. दोन्ही कुमारांचा ठरल्याप्रमाणे अंतझाल्यानंतर धर्मगुरूंनी मानभावीपणाने केलेले भाष्य हे तर माणसामधले हव्यासाने बरबटलेले जनावर दाखवून देणारे आहे. धर्मगुरू म्हणतात, 'विधीलिखितापुढं मानव असहाय आहे. आज चंद्रोदयापासून साम्राज्याचं शासन धर्मगुरूंच्या नावे चालेल. आम्हाला राजतृष्णा नाही, सत्तालोभ नाहीय परंतु कर्तव्याची धुरा स्वीकारण्याचा क्षण येताच ती नम्रपणे स्वीकारणे हा धर्म आहे. भविष्यकालातील त्रिसंवत्सरानंतर जर सम्राटांची निवड झाली, तर हा विश्वासनिधी त्यांना देण्यास आम्हाइतका हर्ष कोणासच होणार नाही पण त्या काळापर्यंत आपले कर्तव्य आम्हांला निरीच्छपणे पार पाडले पाहिजे.' हेच धर्मगुरू मंदिराच्या प्रमुख सेविकेची कन्या असलेल्या ध्रुवशीलेच्या यौवनाचा आस्वाद घ्यायला उत्सुक आहेत. तिच्याशी बोलताना तर ते 'सारे नीतीनियम सांभाळून युद्ध करण्याची इच्छा असर्णायाने युद्धभूमीवर पदार्पण करू नये' असेही म्हणतात. धर्माचे आणि धर्मगुरूंचे हे रूप वाचकाला दिग्मूढ करून जाते.

'वंश' मधल्या करेव्वाचे वांझपणाचे शल्य तिला अचाट धाडस करायला भाग पाडते. रात्रीच्या अंधारात दोन मैलांवर असलेल्या, बसक्या टेकड्यांमधील रानमारूतीच्या देवळात एकटीने जाऊन तिथल्या पाचसहा झाडांच्या घोळक्यात नारळ पुरायला ती बाहेर पडते. दिवसाढवळ्या भीती वाटावी आशा ठिकाणी रात्री एकटीने ती हे धाडस करते. तिच्या आईने असेच केले होते व त्यानंतरच तिचा जन्म झाला होता, त्यामुळे ती तिथल्याच मातीची आहे अशी तिची श्रद्धा आहे. तेवढ्यात त्या अंधारात धर्मशाळेत राहाणारा एक बैरागी तिच्यावर झेप घेतो. संतापाने करेव्वा त्याला ढकळून देते आणि आपल्या हातातल्या पहारीने त्याच्यावर अंधारात अंदाजानेच घाव घालते. त्याची हालचाल संपल्यावर बाकी तिला आपल्या आईचे शब्द आठवतात आणि हा बैरागी कदाचित आपला बापच असू शकेल या कल्पनेने ती अंतर्बाह्य थरारून जाते. भीती वाटली की आधार मिळावा म्हणून तिच्या आईने तिला मंतरून दिलेली कवडी हातात घेऊन ती बेभानपणे तिथून धावत सुटते.

करेव्वा जोगतीणीची मुलगी आहे. तिच्या आईच्या केसांत जट आणि गळ्यात कवड्यांची माळ आहे. तिची आई तोडगे सांगत असे. त्यामुळे तिला असल्या गोष्टी काही नवीन नाहीत. लालभडक रानमारूतीचीच आपण लेक आहोत असा तिचा विश्वास आहे आणि हाच रानमारूती आपली कूस उजवेल असेही तिला वाटते. पण मधेच हे राखेच्या चवेचे केसाळ कुबट मढे कोठून आले हे तिला कळत नाही आणि मग हा आपला बाप तर नव्हता ना या शंकेने ती फार फार घाबरून जाते. करेव्वाच्या श्रद्धा सच्च्या आहेत. ती मनाने सरळ आहे. तिचे वांझपणाचे दु:खही फार जळजळीत आहे. हे वांझपण आपल्याच वाट्याला का आले हा विचार करताना ('प्रदक्षिणा' मधल्या शांताक्कांना वाटते तसे) तिला आपणच आपल्या आयुष्यात केलेली कृत्ये आठवतात. लहानपणी दुपारी गुरे चारायला नेत असताना ती सुस्ती टाळण्यासाठी काठी घेऊन तळ्याकाठाच्या चिखलातल्या बेडक्या मारत असे, निव्वळ गंमत म्हणून तिने पाटलाच्या गवताच्या गंजीला आग लावली होती आणि त्यात दोन बैल तडफडून जळाले होते, काळम्माच्या देवळातल्या उंबर्यावर खिळ्यांनी बसवलेल्या नाण्यातला एक रुपया तिने उखडून चोरला होता आणि आईला विंचू चावलेला असताना तिने जंगमाला बोलावून आणण्याचा कंटाळा केला होता. या सगळ्यामुळे तर आपले आयुष्य असे वांझोटे झाले नाही ना असे तिला वाटते. आपल्याच करणीने आपल्याला हे असले आयुष्य लाभले ही करेव्वाची श्रद्धा आहे, हा तिचा धर्म आहे.

'पिंगळावेळ' [६] या जीएंच्या कथासंग्रहातील 'ऑर्फियस' या कथेत ऑर्फियस सीची पत्नी यूरिडिसी सर्पदंशाने मृत्यू पावलेली आहे. मृत्यूनंतर यूरिडिसी वैदेही स्वरुपात प्लूटोच्या कृष्णलोकात गेली असली पाहिजे असे ऑर्फियसला वाटते. त्याच्या हातातील वाद्याच्या संगीताने त्याला प्लूटोच्या कृष्णलोकात प्रवेश मिळतो पण तेथील बंदिस्त जीव त्याच्याकडे सुटकेसाठी विनवण्या करू लागतात. त्या लोकातल्या देवांकडून आपल्या संगीताची स्तुती ऐकून ऑर्फियस म्हणतो, 'राजन तुम्ही म्हणता तो स्वर मला मिळाला आहे. पण त्यात माझा मोठेपणा काहीच नाही. माझ्या संगीताने शिलाखंड हलतात, पण वेदनेने तळमळत असलेल्या एका जीवाचे दु:ख

मला नाहीसे करता येत नाही की एका मृत शरीराला जिवंत करता येत नाही' त्यावर देव त्याला म्हणतो की हे सगळे जर तुला करता येत असते तर तू आणि देव यांच्यात काय फरक राहिला असता? पण ऑर्फियस बरोबर यूरिडिसीला परत जाण्याची देव परवानगी देतो ती या अटीवर की ते दोघे सूर्यप्रकाशात जाईपर्यंत ऑर्फियसने ती आपल्या मागे येत आहे की नाही हे वळून पहावयाचे नाही. ऑर्फियस तिला घेऊन जायला निघतो खरा, पण मृत्यूच्या स्पर्शाने तिच्यात झालेला बदल बघून तो चमकतो. आपण आणि ती यांच्यामधला, मृत्यू घडतो हे केवळ माहीत असलेली व्यक्ती आणि प्रत्यक्ष मृत्यू भोगलेली व्यक्ती यांच्यातले अंतर त्याला जाणवते आणि यूरिडिसीकडे बघून तो यूरिडिसीला परत कृष्णलोकात पाठवतो. त्यानंतरही देव यूरिडिसीला परत जायची परवानगी देतो पण यावेळी यूरिडिसीच त्याला नकार देते. देव ऑर्फियसला सुखाच्या क्षणभंगुरतेचे महत्त्व सांगतो. सुखाला अंत आहे ही जाणीवच मानवाच्या जीवनात महत्त्वाची आहे हे ऑर्फियसलाही पटते. ऑर्फियस परत गेल्यानंतर देवता देवाला म्हणते,' स्त्री काय, पुरुष काय, मानव म्हणजे एकंदरीत डोळ्यांच्या बाहुल्या उफराटया असलेला एक प्राणी आहे हेच खरे! दोनदा संधी मिळून रिता राहिलेला हा माणूस बुद्धीहीन किंवा दुर्दैवी असला पाहिजे.'

देवाने त्यावर दिलेले उत्तर जीएंच्या विचारपद्धतीला अनुसरून असेच आहे. देव म्हणतो, 'नाही देवते, ती दोघेही शहाणी आहेत. यालाच कदाचित ज्ञानदेखील म्हणता येईल. वाट्याला अमर्याद दु:ख पण ते सहन करण्याची मर्यादित शक्ती, अपार आकांक्षा, पण ते साध्य करण्यासाठी क्षीण सामर्थ्य, अमृतबीज पेरूनही हाती विषफळ पडण्याची बाधा दृ असा हा मानव! त्याच्या बाबतीत योग्य अयोग्य ठरवण्याचा आपण निव्वळ देवांना काय अधिकार आहे?'

ऑर्फियस आणि यूरिडिसी या दोघांनाही जे अटळ आहे त्याची जाणीव झाली आहे. यूरिडिसी तर त्या अंनुभवातून एकदा जाऊनही आलेली आहे. आता पुन्हा तोच आनंद आणि तोच शोक यातली विफलता तिला जाणवली आहे. त्यामुळे ऑर्फियसबरोबर परत न जाणे हाच तिचा धर्म आहे. धर्माची व्याख्या पुन्हा तपासून बघीतली तर इंद्रियांना न जाणवणारे असे एक जग आहे, अशी एका शक्ती आहे आणि तिला शरण जाण्यात, तिच्यासमोर लीन होण्यात मानवी धर्माचे सार सामावले आहे. त्या न्यायाने ऑर्फियस आणि यूरिडिसी हे दोघेही मानवी धर्माचे पालन करत आहेत असे म्हणावे लागते.

'कैरी' या कथेतली तानीमावशी शिकलेली नाही, पण ती काकणे घालून घेतल्यावर कासाराला नमस्कार करते, रात्री झोपताना हळूच 'आस्तिक आस्तिक काळभैरव' म्हणते आणि संध्याकाळ झाल्यावर मीठ, तेल विकत आणत नाही. देशपांडे मास्तरांना ती शिवलीलामृताचा अध्याय म्हणून दाखवते. तानीमावशीला धर्म म्हणजे काय हे माहिती तरी असेल का? बहुदा नाहीच. पण ती मनाने निर्मळ आहे. आपल्या बहीणीवर, भाच्यावर, भावावर तिचे मनापासून प्रेम आहे. जगण्यावागण्याची तिची पद्धत बाळबोध पण सरळ आहे. तिच्या आयुष्याचे दान उलटे पडले आहे ही गोष्ट निराळी, पण त्यामुळे तिचे मन नासले नाही. 'शेवटी आपला शेर असतो तेवढंच आपल्याला मिळतं हेच खरं' हे तानिमावशीचे साधे तत्वज्ञान आहे. तानीमावशीने आपल्यापुरता धर्माचा लावलेला अर्थ हा असा आहे.

'फुंका' ही कथाम्हणजे एक वेगळेच खटले आहे. यमनी जोगतीणीच्या खोपट्यात माणसांची हाडे, कवटी वगैरे आहे. अमावास्येच्या रात्री खोपटाजवळ शेकोटी पेटलेली असते आणि यमनी तिच्याभोवती फिरत असते. यमनी पौर्णिमेला जग्ग घेऊन दारोदार हिंडते. जग्गाच्या कडेने छोट्या मूर्ती बसवल्या आहेत व मध्येच उंच आलेल्या कोक्यावर दोन विती उंच असा मुख्य मुखवटा आहे आणि सभोवार निरनिराळ्या रंगांच्या खणांच्या घड्या सोडल्या आहेत. यमणी आली की माणसे भेदरून मूठपसा तांदूळ जोंधळे टाकतात, पैसे देतात आणि हातावर भंडारा पडला की सुटलो म्हणून निसटतात. यमनी माणसांवर फुंका टाकते असा समज आहे. संगाला हे काही नक्की ठाऊक नाही. तूर्त तरी तो गंगूलीच्या, त्याच्या लहानशा मुलीच्या, मरणाच्या दु:खात अडकला आहे. कसली टाण मुलगी, पण संध्याकाळी अचानक तिचे पोट फुगले, तोंड सुजले आणि करकरीत संध्याकाळी ती मसणवाटेत गेली. तिच्यामागोमाग संगाची बायको पार्वती अंगात आल्यासारखी ओरडली आणि घरातून निघून गेली. गंगूलीच्या मरणाला संगाची पापेच जबाबदार असे पार्वतीला वाटते आहे. संगाने परटीणीच्या पोराच्या कानातले डूल लांबवले, देवळातली समई उचलली.. या सगळ्या पापाचे फळ म्हणून गंगुली मारून गेली असा गावगन्ना करून पार्वती निघून गेली. त्याआधी गंगूलीची बाहुली बघायला म्हणून यमनी तिचा जग्ग घेऊन आली होती तेंव्हाही पार्वतीने तिच्या जिभेचा पट्टा सोडला होता. यमनी आहेच तशी, लोकांच्यावर फुंका टाकणारी. त्यानंतर यमनीच्या घरावरून जाताना संगाने तिच्या जग्गमधला मुखवटा लांबवायचा विचार केला होता, पण तेवढ्यात यमनीच तिथे

आली आणि तिने संगाच्या नावाने बोंब केली. त्यानंतर तर काय, गंगुलीचे मरण, पार्वतीचे घर सोडून जाणे.. संगाचे डोके विस्कटल्यासारखे झाले आहे. त्यात गावातले कुणीच त्याच्याशी धड बोलत नाही. मग तो शेवटी बाबल्याचे मानगूट धरूनच संगा त्याला विचारतो की गावाला झाले आहे तरी काय? बाबल्या किंचाळून त्याला सांगतो, 'काल यमनी जग्ग घेऊन आली विहीरीजवळ, तेंव्हाच मी म्हणालो महादूला– बाबा रे आज फेरा आला. लक्षण काही ठीक नाही. यमनी आली, आणि गुडघे टेकून मातीतच बसली. तू तिच्या जिवावर उठला आहेस म्हणून तिने तासभर बोभाटा केला. मग घसाघसा माती घासून तिनं तीनदा डोक्यात घातली आणि डोकं हळदीनं भरलं. हातात तीनदा भंडारा घेऊन तुझ्या नावानं तिनं भंडारा उधळला आणि तुझ्यावर फुंका टाकला. फुंका अमाशेपर्यंत जारी आहे...'

संगाचे डोकेच फिरते. तो धडपडत यमनीच्या खोपटापर्यंत येतो. यमनीच्या झोपडीत तो डोकावून बघतो. यमनी किंचित खाली वाकलेली असते. हळदीने माखलेल्या तिच्या कपाळाखाली तिच्या कवड्यांची माळ किंचित पुढे आलेली असते व यमनी संथपणे डोलत असल्याने ती हिंदकळत असते. यमनी दोन्ही हातांवर बाहुली घेऊन लहान मुलाप्रमाणे जोजवत असते आणि मध्येच जाड ओठांनी बदबद आवाज काढत असते. यमनीच्या हातांवरची ती बाहुली गंगुलीची असते. संगा संतापाने बेहोश होतो आणि यमनीच्या खोपटाचे दार मोडून आतमध्ये शिरतो. तिच्या जग्गावरचा मुखवटा उचलून तो आवेशाने यमनीवर हाणतो, हाणतच राहातो. डोके फुटून यमनी मारून जाते आणि गावातली सगळी माणसे, त्यात संगाला चांगला ओळखणारा म्हातारा म्हामू कासार हे सगळे त्या झोपडीत येतात. मेलेल्या यमनीला बघून सगळे लोक स्तब्ध होतात. म्हामू तर कपाळावर हात मारून घेतो आणि कुणाला काय बोलावे ते कळत नाही. शेवटी गोपाळ म्हणतो, 'संगा, तू विचारत होतास नव्हं सांजचं? तू असाच एका रात्री चोरासारखं येणार आणि आपला चेंदा करणार असंच यमनी म्हणत होती. तिला तसलं दोनदा स्वप्नात दिसलं म्हणे. म्हणून तर तिने तुझ्यावर फुंका टाकला होता. आणि रेड्या आता तस्सं करून बसलास नव्हं!'

हळूहळू सगळे लोक निघून जातात आणि संगाच्या सोबतीला म्हातारा म्हामू कासार राहातो. संगाशी बोलताना तो जे म्हणतो ते या कथेचे सार आहे. तो म्हणतो,'यमनीचा फुंका जाऊ दे खड्ड्यात. आमच्यावर सगळ्यांवरच एक अस्मानी फुंका पडलेला असतोय उमरभर! संगा, तुला सांगू काय? अरे, बेवकूफ तुझी माझी सगळ्यांची उमर म्हणजेच फुंका हाय नव्हं? त्याला यमनी काय करणार, तू काय करणार आणि टिनपाट फाटका म्हाम्या तरी काय करणार?'

जे होणार ते होणारच, ते अटळ आहे आशा नियतीवादाबरोबरच जीए 'फुंका' मध्ये लोकांनी धर्माचा लावलेला अर्थ आणि धर्मपालनाच्या लोकांच्या कल्पना याच्यावर भाष्य करतात. लोकांचे कल्याण हा धर्माचा साधा अर्थ ध्यानात ठेवणे कुणालाही जमले नाही आणि धर्माने जे गौण मानले आहे ते नुसतेच धर्माच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे असे नाही, तर ते म्हणजेच धर्म अशी लोकांची चमत्कारिक कल्पना झाली आहे. 'एखाद्याला पूजा करण्याच्या आधी शिंक यावी आणि म्हणून पूजा करण्याच्या आधी शिंकलेच पाहिजे असे लोकांनी समजावे' असे जीएंनीच एका ठिकाणी लिहून ठेवले आहे. 'फुंका' या कथेत खलनायक कुणीच नाही. यमनी संगावर फुंका टाकते तो स्वतरूचा जीव वाचवायचा म्हणून. संगा यमनीचा जीव घेतो तो तिने गंगूलीवर फुंका टाकला आहे या शंकेतून. जोगतीण यमनी, तिचा फेरा, तिचा जग्ग, तिचे भंडारा उधळणे हे सगळे कशासाठी? ही नुसती अर्थहीन कर्मकांडे नाहीत. या सगळ्यांमागे लोकांची श्रद्धा जागृत व्हावी, लोकांना मानसिक आधार, उभारी मिळावी हा धर्माने सांगितलेला उद्देश आहे. पण या सगळ्याचे हे काय होऊन बसले आहे? त्यामुळेच 'धार्मिक' या शब्दाचा नवा अर्थ लक्षात येताना (आणि जीएंसारखी संपूर्ण नास्तिक असलेली व्यक्तीही धर्माचे पालन करणारी, धार्मिक असू शकते हे ध्यानात येतानाच) 'संगा, तुला सांगू काय? अरे, बेवकूफ तुझी माझी सगळ्यांची उमर म्हणजेच फुंका हाय नव्हं? त्याला यमनी काय करणार, तू काय करणार आणि टिनपाट फाटका म्हाम्या तरी काय करणार?' हे म्हामूचे उद्‌गार अधिकाधिक पटत जातात.

'तळपट' मधल्या दानय्या गारुड्याचा धर्म काय आहे? त्याचे साप काळ्या विजेसारखे किंवा केशरी किरणांसारखे का दिसतात? त्यांच्यासमोर इतर साप घूस, गांडूळांप्रमाणे का दिसू लागतात? याचे उत्तर मास्तरांना दानय्याच देतो. तो म्हणतो, 'अण्णा, त्याला काय सोनं, मोती खायला घालतो व्हय? पण जनावर नुसतं खाण्यानं नाही जगत. त्याला काळजाचं रक्त आटवायला पाहिजे. नाग म्हणजे आमचं पोट, आमचा देव. एक पोर वाढवावं, ते फार सोपं, पण जनावर वाढवणं नको. आता नाग हातात घेऊन जन्मलो म्हणा की. आता संपायचं ते नाग हातात घेऊनच.' आणि खरोखर दानय्या नाग हातात घेऊनच संपतो. नेमका नागचतुर्थीला त्याच्याकडे साप नाही

म्हटल्यावर त्याला फार अपराधी, फार शरमल्यासारखे वाटू लागते. त्याच्या नागांचे आत्तापर्यंत तोंड फाटेपर्यंत कौतुक करणारे लोक आज त्याला शिव्या घालू लागले, त्याच्यावर दगड मारू लागले हे बघून त्याला फार उर्पयासारखे वाटू लागते. आता काहीही करून आपल्या हातात साप पाहिजे या भावनेने त्याचे मन तळमळू लागते. गोंदाला पोलिसांनी धरून नेला आहे म्हणजे त्याच्या झोपडीत त्याचे जनावरे असणारच हे त्याच्या ध्यानात येते आणि आजवर कधी न पडलेला मोह त्याला होतो. गोंदाच्या घरात शिरून तो त्याची बुट्टी उचलतो पण तोवर सगळे गावच त्याच्या अपराधाची साक्ष द्यायला आल्यासारखे त्याच्यापुढे गोळा होते. कधी नव्हे ते आपल्या हातून हे असले आक्रीत कसे घडले हे दानय्याला कळत नाही ('नाग' या कथेत बाबाजीच्या हातूनही असलेच काहीतरी शेंडाबुडखा नसलेले घडलेले असते. अर्थात त्यामागची प्रेरणा वेगळी असते). दानय्याच्या मते हे अधर्माचे वागणे झालेले असते. त्याला वस्तीतून हाकलून द्यायला सगळी वस्ती एक होते आणि दानय्यासमोर त्याला आता तू इथनं जा म्हणणारा चंदर उभा राहातो. भसाभसा वाढलेला हा त्याचा लांबचा नातू कृष्णगोल्ल जातीचे रक्त अंगात बाळगून आता गारुड्याचा धंदा सोडून कुठेतरी भांगलायला जाऊन पोट जाळतो आहे. भारे टाकावेत आणि रात्री बिनघोर झोपावे असे म्हणून त्याने आपला परांपरागत गारुड्याचा व्यवसाय सोडला आहे. आराम करायचा असता तर दानय्यालाही करता आला असता, तेही कणसासारख्या भरलेल्या रुकमीला कुशीत घेऊन, तिच्या बापाचे शेत कसत आरामात बसून. पण त्याचा अंगातले कृष्णगोल्ल रक्त त्याला स्वस्थ बसू देत नाही आणि रुकमीला, तिच्या बापाला आणि त्यांच्या आराम शेतीला सोडून तो परत गारुडी व्हायला परत येतो. पण रुकमी शांत बसत नाही. दानय्याच्या वस्तीवरची कुत्री पोट फुगून मारतात, त्यांच्या झोपड्यांना रुकमी चूड लावते आणि दानय्याची वस्ती फाटल्यासारखी होते. त्यानंतर दानय्या उपाशीपोटी गावोगाव भटकतो, वाटेल ते करतो पण आपला धंदा सोडत नाही, आपल्या कृष्णगोल्ल रक्ताची हाक कानाआड करत नाही.

कारण तो त्याचा धर्म आहे.

धर्माची ही नवी व्याख्या मांडताना जीए दानय्याच्या आत्म्याच्या गाभ्याला हात घालतात. कुठेतरी दिवसभर राबावे आणि रात्रीला गपगार झोपावे असे वाटर्णाया तरुण पोरांच्या अंगात रक्त आहे की गाढवाचे मूत आहे हा प्रश्न दानय्याला का पडतो? हे असले सगळे त्याला त्याच्या काळात मिळाले नव्हते म्हणून नाही, तर हेच काय पण यापेक्षा कितीतरी अधिक हातात असताना ते नाकारून तो असले फिरस्ते, भणंग आयुष्य जगला पण आपल्या गारुड्याच्या धर्माशी इमान राखून राहिला म्हणून. हेच इमान त्याला आता पावले थकत चाललेली असताना नव्याने साप धरायला बाहेर पडायला लावते. घोरपड म्हातारी झाली म्हणून काही पाल होत नाही या विचाराबरोबर त्याला आतापर्यंत त्याने धरलेली जातीवंत जनावरे आठवतात, वाव, दोन वाव लांबीचे जनावर बुट्टीत घालून आणताना मनाला आलेला उत्साह आठवतो. डोंगरावर चढताना त्याला तेथे असलेली बाभळ करंजाची झाडी आठवते. तिच्यावर पडलेल्या निर्दय कुहाडी आठवतात आणि माड्यांची घरे बांधण्यासाठी गुराख्यांनी गाडीभर जातिवंत जनावरांची केलेली कत्तल आठवते. या सगळ्या पार्श्वभूमीवर काल कसे काय आपले पाऊल वाकडे पडले आणि गोंदाचे जनावर चोरण्याची वासना झाली हे त्याला काळात नाही. पण अद्याप त्याचा कणा ताठ आहे. त्याचे शरीर थकत चालले आहे, थकलेच आहे पण त्याला आपल्यामागे वस्तीत कृष्णगोल्ल रक्ताचे काय होणार याची चिंता आहे. त्याचा मागे उरला आहे सगळा रांडावळा. गवत कापणारी, मोलमजुरी करणारी, मोटारीची ढुंगणे धुणारी सगळी किरडू कुणबटे..

त्या तिरीमिरीत दानय्या उठतो आणि आणि धगधगीत केशरी रंगाच्या एका नागाला हात घालतो. चवताळलेला नाग दानय्याच्या हातातून सुटण्याची धडपड करतो आणि जिवंत आगीच्या लोळाप्रमाणे दिसणारा नाग आणि संपत आलेला पण अंगात जातिवंत रक्त बाळगणारा दानय्या यांची एक झुंज सुरू होते. यात नागाने दानय्याच्या मांडीचा चावा घेतल्यावर दानय्याला नागाने युद्धातला एखादा धर्मनियम मोडल्यासारखे वाटते. आपल्या हातातला कोयता उगारून दानय्या त्या नागाचेही तुकडे तुकडे करतो पण केशरनागाच्या तीव्र चाव्याने जखमी झालेला म्हातारा दानय्या अंगाला झटका देऊन उघड्या ओल्या ओठांनी तापलेल्या उन्हात मरून जातो.

दानय्याच्या जगण्याची आणि मरण्याची ही कथा वाचताना लक्षात येते की आपली पावले कोणत्या वाटेवर चालावीत याबाबत काही संकेत मानणारा हा माणूस आहे. मूल्य, श्रद्धा वगैरे शब्द आणि कल्पना त्याच्या परीघाच्या बाहेरचे असतील पण कुणी काय करावे, कसे जगावे, कसे वागावे याबद्दलच्या त्याच्या कल्पना बांधीव आणि स्पष्ट आहेत. मर्दाचे शरीर बाळगर्णाया त्याच्या पुढच्या पिढीने परांपरागत धंदा सोडून ढोरासारख्या राबवर्णाया पण सोप्या मार्गाने भाकरी कमवावी या कल्पनेने त्याचे डोके तापते. नागचतुर्थीला जेथे त्याने विजेसारखी जनावरे

मिरवली तेथे त्याला मातीचा नाग न्यावा लागतो या शरणागतीमुळे त्याला शरम वाटते आणि शेवटी लाजलज्जा गुंडाळून ठेवून गोंदाचे जनावर चोरताना पकडले गेल्यानंतर तर त्याला आपलीच किळस वाटू लागते. म्हार्ताया दानय्याला आता एवढा धोका पत्करून डोंगरावर जाऊन नवीन जनावर पकडावे असे का वाटते? त्याच्या थकलेल्या शरीराच्या पाठीचा कणा अद्याप ताठ कसा आहे? रुकमीच्या बापाची, रावण्याची जमीन आणि भेंडी फुटायला आल्यासारख्या रुकमीचे शरीर हे सगळे नाकारून उन्हातान्हात तरवाळत, या वारुळात बघ, त्या वारुळात काठी घाल असे करत तो आयुष्यभर जगून आणि आयुष्याच्या शेवटी मारून का गेला आहे?

कारण तो त्याचा धर्म आहे.

धर्म या संकल्पनेची व्याख्या करण्याचे कितीतरी प्रयत्न झाले, होत आहेत. धर्माचरण म्हणजे काय यावर लेखन झाले, व्याख्याने झाली, प्रवचने झाली. पण यातले काहीही माहिती नसताना आपला धर्म काय आणि तो कसा पाळावा हे दानय्याला बरोबर कळाले आहे. जे योग्य आहे ते करणे इतकी सोपी दानय्याची धर्माची व्याख्या आहे. आणि त्यामुळे शेवटी अस्सल केशरनागाचे विष अंगात भिनवून घेऊन मरणे ही त्याच्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे.

'मुक्ती' ही सकृतदर्शनी द्रोणाचार्य आणि एकलव्य यांच्या गुरु–शिष्य नात्यावर आधारलेली कथा आहे. पण गुरूंची अनुज्ञा न घेता धनुर्विद्येचे ज्ञान प्राप्त करून घेर्णाया शिष्याला गुरूदक्षिणा किंवा प्रायश्चित्त म्हणून आपला अंगठा द्यावा लागणे येथेच हे साम्य संपते. उजव्या हाताचा अंगठा कापून दिलेला तो शिष्य डाव्या हाताचा धनुर्धर असतो आणि गुरुजींवर झेपावर्णाया सर्पाचा तो डाव्या हाताने बाण मारून वेध घेतो. सत्य परिस्थितीचे ज्ञान नसलेले गुरुजी त्याला रक्तपिती होईल असा शाप देतात. एकलव्याची कथा माहीत असल्यामुळे त्या धनुर्धर शिष्याने जाणूनबुजूनच डाव्या हाताने या विद्येचा सराव केलेला असतो. ज्याला गुरुजी कपट समजतात ते केवळ स्वसंरक्षण असते. संयम सुटलेला तो शिष्य आपले धनुष्य गुरुजींच्या दिशेने भिरकावून देतो, ते त्यांच्या मस्तकावर लागते, गुरुजी खाली पडतात आणि रक्तपितीने अंगाचे तुकडे तुकडे हरवत तो शिष्य दिशाहीन अवस्थेत भटकत राहातो. त्यानंतर काया झाले हे त्याला ठाऊक नसते. या सगळ्या घटनेला साक्षी असलेला बैरागी त्याला गुरुजींनी मृत्यूपूर्वी त्या शिष्याला दिलेया उरूशाप सांगतो. गुरुजींच्या कन्येने पितृहत्येचा अपराध विसरून जर त्या शिष्यावर एक नजर टाकली तर तो शिष्य शापमुक्त होणार असतो.

पण त्या शिष्यावर झालेला अन्याय बघून चवताळलेली त्या शिष्याची आई गुरुजींच्या मुलीला शाप देते की गुरुजींच्या मृत्यूनंतर त्यांची कन्या जर सूर्यप्रकाशात गेली तर तिच्या अंगावरची ती जागा जाळून जाऊन त्या जागी खेकडे चिकटतील. पण नंतर सगळी वस्तुस्थिती समजल्यावर तीदेखील गुरुकन्येला एक उ:शाप देऊन निघून जाते. त्या गुरुकन्येला त्या शिष्याने स्पर्श केला तर ती त्या शिष्याच्या आईने दिलेल्या शापातून मुक्त होणार असते.

शाप उ:शापाचा हा गुंता आता या दोन निष्पाप जीवांच्या आयुष्यांना वेढून उरला आहे. शिष्याची रक्तपिती गुरुकन्येच्या नजरेने संपणार आहे. गुरुकन्येचा सूर्यदाह शिष्याच्या स्पर्शाने संपणार आहे. तेवढ्यात ती गुरुकन्या त्याला सांगते की प्रथम त्या शिष्याने तिला मुक्त केले पाहिजे, कारण तिने चुकून कधीतरी सूर्यप्रकाशात एकदा डोळे उघडले होते आणि तत्काळ ते डोळे जळून गेले आहेत. ती आता पूर्ण आंधळी आहे. तिचे अंधत्व संपेल, पण त्यासाठी त्या शिष्याने तिथल्या गोमुखातील पाण्यात बोटे बुडवून उजव्या हाताच्या अंगठ्याने तिच्या डोळ्यांना स्पर्श करावयाचा आहे. उजव्या हाताच्या अंगठ्याने! जो त्याने त्या गुरुकन्येच्या पित्याला गुरूदक्षिणा म्हणून अर्पण केला आहे.

मुक्तीच्या प्रतिक्षेतले हे दोन असहाय जीव एकमेकांसमोर उभे आहेत, त्यांच्या मुक्तीची साधने ते स्वत:च आहेत. पण ते मुक्त होऊ शकत नाहीत. त्यांची काय चूक आहे? त्यांचा काय अपराध आहे? पण ते काय आणि त्यांचे आईबाप काय, सगळेच केवळ निमित्तमात्र आहेत. विद्येची आराधना हा धर्म शिष्याने पाळला, आपल्या विद्येचा उपमर्द करर्णायाला शासन हा धर्म गुरुजींनी पाळला, अन्यायाचा सूड हा धर्म शिष्याच्या आईने पाळला आणि अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी दिलेले उ:शाप हा धर्म गुरुजी आणि शिष्याची आई या दोघांनी पाळला. आणि गुरुकन्या? तिचा काही अपराध नाही, तिची या सगळ्यात काही भूमिकाही नाही. तिने फक्त आपल्या पित्याची कन्या होण्याचा धर्म पाळला आहे. आणि या सर्वांना आपापले धर्म पाळूनही मुक्ती मिळत नाही. ते दोघेही त्यांच्या जीवघेण्या आशेतून सुटतात तीच त्यांची मुक्ती ठरते.

आदम आणि इव्ह यांच्यावर आधारलेली 'कवठे' ही कथा आहे.आदमच्या जागी दामू आहे, कमळी इव्ह आहे आणि सफरचंदाच्या जागी कवठ आहे. (मूळ कल्पनांचे मराठीकरण, देशीकरण करताना जीएंची विलक्षण कल्पनाशक्ती आणि प्रतिभा दिसून येते. सफरचंदाला पर्याय म्हणून ते बाकी कुठले फळ न वापरता कवठ हे अगदी देशी फळ वापरतात). या कथेतील कर्मकांडाचा धर्म आणि कमळी आणि दामूचा धर्म यांमधला फरक जाणवण्यासारखा आहे. द्वैतवादी वैष्णव वामानाचार्य आणि अद्वैतवादी शैव काशीनाथाशास्त्री हे त्या नवीन प्रकाशात आलेल्या देवळात राम–सीतेच्या मूर्ती आहेत की गणपतीची मूर्ती आहे यावर खल करतात. भोळ्या दामूला तर तेथे फक्त मुंगसाचे चित्र दिसते. मग सामोपचाराने ते देऊळ कुठल्याही देवाचे नसून स्वयंभू आहे असे ठरते, मग कुणीतरी कंत्राटदार त्या देवळाच्या जीर्णोद्धारासाठी विटा, फरशा पाठवतो आणि एक बसके देऊळ उभे राहाते. त्या कंत्राटदाराचा सत्कार आणि तोंड फाटेपर्यंत स्तुती होते आणि उरलेल्या साहित्यातून वामनाचार्य व शास्त्री यांच्या अंगणात फरशा होतात. शेवटी दोघेही त्या देवळाकडे जाणे बंद करतात आणि त्या देवळाच्या झाडलोटीचे काम कमळीला मिळते. त्या देवळात कमळी आणि दामू भेटतात आणि दामूला कमळी तिच्या गाठोड्यातली भाकरी आणि कवठाची चटणी खायला देते. नंतर कवठे आणायला ते दोघे कवठाच्या बागेत जातात आणि तेथे पेरवाच्या बागेत, रानफुलांखाली त्या दोघांचे मीलन होते.

लौकिकार्थाने अनैतिक आशा दामू आणि कमळीच्या संबंधांबाबत कमळीला कसलीही खंत नाही. दामू तर भोळाच आहे, पण 'बाग छान होती' या दामूच्या म्हणण्यावर कमळी जे म्हणते ते तिच्या विचारसरणीचे द्योतक आहे. ती म्हणते,'अरे, तू तर दीड शहाणाच आहेस. बाग छान नव्हती. आम्ही छान होतो. आम्हाला काय बागच पाहिजे, होय रे आडदांडा? आयुष्यभर बागेतच पेरवे खात हिंडायला आम्ही काय खुळचट पोरं आहोत की बडबड पोपट आहोत? आम्ही जिथं बसू त्या ठिकाणी आमची बाग. ती बाग म्हणजे काही सगळं जग नव्हे. अरे, एवढ्या मोठ्या मातीत मरायला चार वाव जागा कशीही मिळते, तर चार वाव जागा जगायला मिळणार नाही होय?'

'कवठे' या कथेत धर्माचे पालन करणारे कोण आहेत? देऊळ शैवांचे आहे की वैष्णवांचे यावरून धक्काबुक्की करणारे लडदू शास्त्री आणि आचार्य की आपल्याला हवे ते सुख हक्काने मागून घेणारी आणि देणारी कमळी? 'बाग छान नव्हती, आम्ही छान होतो' म्हणणाया कमळीचा धर्म तिच्या मनात आहे. शास्त्रींचे आणि आर्चायांचे कथानक आधी या कथेला जोडलेला बादरायण संबंध वाटतो, पण नंतर यामागचा जीएंचा सूक्ष्म विचार लक्षात येतो. कर्मकांडांवरून रणकंदन करणारे पण आपल्या घराच्या अंगणात फुकट फरशी करून मिळाल्यावर एकदम गप्पागार होणारे आणि नंतर त्या देवळाकडे चुकूनसुद्धा न फिरकणारे शास्त्री आणि आचार्य आणि निकोप शरीराची आणि त्याहूनही निकोप मनाची कमळी (आणि नुसताच फसफसून वाढलेला दामू) यात धर्मपालन करणारे कोण आणि धर्म बुडवणारे कोण? 'कवठे' ला फक्त एक प्रणयकथा असे म्हणणे हे त्या कथेवर अन्याय केल्यासारखे आहे याचे कारण हे असे आहे. सापाला घाबरणाया दामूला हातावर साप गोंदवून घेतल्यानंतर आपल्याला चांगलं ऐकू यायला लागलं असं म्हणणारी कमळी पुढे म्हणते, 'पुष्कळ वेळा आपल्याच आतून पोटातून , आतड्यातून कुणीतरी बोलत असल्यासारखं वाटतं, पण ते काही केल्या स्पष्ट ऐकू येत नाही. अर्धवट ऐकून काहीतरी केलं तर आपलंच चुकलंमाकलं असं फार वाटायला लागतं. इतरांसमोर मान वर करायला होत नाही. पण त्या दिवसापासून सारं स्पष्ट, खणखणीत ऐकायला येऊ लागलं, मला काय पाहिजे नको ते समजायला लागलं, आणि तसं मी करत गेले. मग कुणापुढे मान खाली घातली नाही, की कुणाची नजर चुकवली नाही. ऊन अंगावर पडावं असं वाटलं, त्या वेळी सरळ उन्हात जाऊन उभी राहिले. हे सगळं त्या सापामुळे झालं की नाही ते सांग?'

ऐहिक सुखांच्या पलीकडे जाऊन पारमार्थिक आनंद मिळवणे आणि मानवी मर्यादांच्या पुढील दैवी शक्तीपुढे लीन होणे आणि त्या शक्तीच्या सामर्थ्यात विलीन होणे हा धर्माचा अर्थ असला तरी तो त्याचा एकमेव अर्थ नाही किंवा नसावा. तसे असेल तर कमळी आणि दामू दोघेही धर्मबुडवे आहेत. पण 'कवठे' वाचल्यानंतर कमळी हीच धर्माचे पालन करणारी आहे आणि शास्त्री आणि आचार्य हे ढोंगी आणि धर्मभ्रष्ट आहेत असे वाटायला लागते. धर्माची व्याख्या आणि संकल्पना अशी काळानुरूप बदलली जाते किंवा जावी. साहित्याचा अशा व्याख्यांचे पुनर्लेखन करण्यात मोठे योगदान असते. जीएंची 'कवठे' वाचून हाच अनुभव येतो.

समारोप:

सदाचार' आणि 'कर्मकांडे' हे धर्माचे दोन मूलाधार मानले तर त्यात सदाचाराला महत्त्व किती आणि कर्मकांडाना किती हा चर्चेचा आणि विवादाचा विषय होऊ शकतो. धर्माचे आजचे स्वरूप लक्षात घेतले तर पूजा,

अर्चा, उपासना, उपास, अभिषेक, दक्षिणा म्हणजेच धर्मपालन असा लोकांनी धर्माचा अर्थ लावलेला दिसतो. हे जो करतो तो धार्मिक आणि जो करत नाही तो धर्मबुडवा असा सामान्य समज झालेला आहे. जीए स्वत: नास्तिक असल्यामुळे त्यांना कर्मकांडांमधील फोलपणा जाणवत असला पाहिजे. त्यामुळे त्यांच्या लेखनात लौकिकार्थाने धार्मिक आणि धर्मबुडवे अशा दोन्ही प्रकारचे लोक आढळतात. जीए अशा लोकांचे एक द्वंद्व लावून देतात आणि त्यातले बरोबर काय आणि चूक काय हा निर्णय ते वाचकावर सोपवतात. लौकिकार्थाने धार्मिक लोकांच्या वाट्याला खरे तर सुख आणि समाधान यायला हवे, पण ते तसे होत नाही. आणि दुराचारी माणसाला शासनही होत नाही. त्यामुळे 'जे होईल, ते होईल', 'अल मख्तूब, मख्तूब!' हा जीएंचा लाडका नियतीवाद त्यांच्या लेखनातील 'धर्म' या संकल्पनेला पुरून उरतो.

संदर्भ:

१. मराठी तत्वज्ञान महाकोश, खंड २, प्रमुख संपादक: देविदास वाडेकर, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, १९७४, पृ. क्र. १४३
२. जी.ए. कुलकर्णी,'गुलाम' 'काजळमाया' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२ पृ. क्र. १७०
३. जी.ए. कुलकर्णी, 'निळासावळा', पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९५९
४. जी.ए. कुलकर्णी, 'रक्तचंदन ' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६६
५. जी.ए.कुलकर्णी, 'पारवा',पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६०
६. जी.ए. कुलकर्णी 'हिरवे रावे', पॉप्युलर प्रकाशन, १९६२
७. जी.ए. कुलकर्णी,'काजळमाया' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२
८. राजा देसाई, 'लोकसत्ता' २८ एप्रिल २०१९.
९. जी.ए.कुलकर्णी, 'पिंगळावेळ', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७

LBP PUBLICATION